# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:29.05.2024** **वार:बुधवार**

- आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यात आपत्ती व्यवस्थापन विभागाची यंत्रणा सज्ज
- स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जयंतीनिमित्त राज्यभरातून अभिवादन
- राज्यात यंदाच्या खरीप हंगामात १ कोटी ४७ लाख ७७ हजार हेक्टरवर पेरण्यांचं नियोजन
- आणि
- कल्याणी नगर वाहन अपघात प्रकरणी अल्पवयीन मुलाचे वडील आणि आजोबांना ३१ मेपर्यंत पोलीस कोठडी

**आपत्ती बैठक**

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी राज्यातल्या सर्व यंत्रणा सज्ज असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन विभागाची बैठक मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत काल मुंबईत पार पडली. या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. मराठवाड्यातील दुष्काळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे, आपदग्रस्तांना मदत आणि आगामी पावसाळा या प्रमुख मुद्यांवर चर्चा झाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. पावसाळ्यात ज्या गावांचा संपर्क तुटतो अशा गावांमध्ये औषधे पुरवणे, पुरेसे अन्नधान्य पुरवणे तसेच कर्नाटक, तेलंगण आणि मध्य प्रदेशमधून येणाऱ्या पाण्याबद्दल समन्वय ठेवणे या विषयावर बैठकीत चर्चा झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. तसंच हवामान खात्याकडून येणारे इशारे नागरिकांना वेळेत कळावे यासाठी हवामान विभागाशीही चर्चा झाल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

**राष्ट्रवादी उमेदवार**

मुंबई शिक्षक मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शिवाजीराव नलावडे यांची उमेदवारी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी काल जाहीर केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या संसदीय मंडळाच्या बैठकीतील निर्णयानंतर नलावडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

**पुणे मतमोजणी-**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठी येत्या १ जून रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. दरम्यान राज्यातली मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली असून आता सर्वत्र मतमोजणीसाठी तयारी सुरू आहे. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार आणि जिल्हाधिकारी तसंच जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी काल कोरेगाव पार्क इथं पुणे आणि बारामती लोकसभा मतदार संघाच्या मतमोजणी केंद्राची पाहणी करून आढावा घेतला.

शिरूर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी रांजणगाव एमआयडीसी भागातील औद्योगिक वखार महामंडळाच्या गोदामात होणार आहे. मतमोजणीच्या परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी अहमदनगर- पुणे महामार्गावर विविध ठिकाणी नो-पार्किंग क्षेत्र घोषित करण्यात आलं आहे.

मावळ लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी आवश्यक तयारी अंतिम टप्प्यात असून त्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज आहे, अशी माहिती मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलात ही मतमोजणी होणार आहे.

**सावरकर**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त काल संपूर्ण राज्यासह देशभरात विविध ठिकाणी त्यांना अभिवादन करण्यात आलं. स्वातंत्र्यवीरांची जन्मभूमी असलेल्या नाशिक जिल्ह्यातील भगूर इथं त्यांना अभिवादन करण्यात आलं. रत्नागिरीतल्या ऐतिहासिक पतितपावन मंदिर, स्वातंत्र्यलक्ष्मी चौक आणि मध्यवर्ती कारागृहातल्या सावरकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसंच जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी यांनी सावरकरांना अभिवादन केलं. पुण्यात फर्गसन महाविद्यालयातल्या वसतिगृहातली सावरकरांची खोली काल नागरिकांना अभिवादन करण्यासाठी खुली ठेवण्यात आली होती. तसंच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही सावरकरांना वंदन करण्यात आलं. स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशनच्या वतीनं आयोजित महोत्सवात रक्तदान शिबिर भरवण्यात आलं. राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही स्वातंत्र्यवीरांना आदरांजली वाहिली. नांदेड, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, धुळ्यातही स्वातंत्र्यवीर सावकरांना अभिवादन करण्यात आलं. सांगलीत खाजगी संस्थांनी त्वचादान विषयावर चर्चासत्र आयोजित केलं होतं. छत्रपती संभाजीनगरमध्ये ४५ महिलांना नारीशक्ती सन्मान प्रदान करण्यात आला.

**खरीप हंगाम**

राज्यात यंदाच्या खरीप हंगामात १ कोटी ४७ लाख ७७ हजार हेक्टरवर पेरण्यांचं नियोजन कृषी विभागानं केलं आहे. शेतकऱ्यांकडून खरीप हंगामाची जय्यत तयारी सुरू आहे. यंदाच्या हंगामासाठी आवश्यक बियाणे राज्यात उपलब्ध आहेत अशी माहिती संचालक विकास पाटील यांनी आकाशवाणीला दिली......

**पोस्टकार्ड**

आदिवासी लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी पांढरकवडा आदिवासी विकास प्रकल्पाच्या वतीनं ४०० आदिवासी गावातल्या सरपंचाना पोस्टकार्डाद्वारे माहिती दिली जात आहे. या पोस्टकार्डावरील क्यूआर कोडवरून विभागाच्या योजनांची माहिती उपलब्ध होते. त्यामुळे सुलभतेने या योजना समजून घेता येणार आहेत.

या उपक्रमामुळे वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचणार असल्याचं प्रकल्प अधिकारी सुहास गाडे यांनी नमूद केलं.

**पोर्शे**

पुण्यातील कल्याणी नगर वाहन अपघात प्रकरणी अल्पवयीन मुलाचे वडील विशाल अगरवाल आणि आजोबा सुरेंद्र अगरवाल यांना ३१ मे पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. पुढील तपासासाठी दोघांची ७ दिवसांची पोलीस कोठडी मिळावी असा अर्ज पुणे पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने न्यायालयात केला होता. अगरवाल कुटुंबियांच्या दोन गाड्या पोलिसांनी ताब्यात घेतल्या असून दोघांच्या एकत्रित चौकशीसाठी हा अर्ज केला.

**समिती ससून**

दरम्यान, या अपघातातल्या अल्पवयीन मुलाच्या रक्ततपासणीत फेरफार केल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी राज्य सरकारनं तीन सदस्यांची समिती स्थापन केली आहे; त्या समितीनं काल ससून रुग्णालयात चौकशी केली. यासंदर्भातला अहवाल राज्य सरकारला सादर करण्याचे निर्देश समितीला दिले आहेत. या समितीनं ससून रुग्णालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह, रक्त तपासणी प्रयोगशाळेच्या कर्मचाऱ्यांची चौकशी केली. या घटनेचा तपास करुन संबंधित सर्वांची चौकशी केली जाईल असं समितीच्या अध्यक्ष डॉ. पल्लवी सापळे यांनी काल पुण्यात पत्रकारांशी बोलताना या सांगितलं. डॉ. सापळे यांच्यासह डॉ. गजानन चव्हाण आणि डॉ. सुधीर चौधरी हे समितीचे सदस्य आहेत.

दरम्यान, पुण्याच्या अपघातप्रकरणाची केंद्रीय अन्वेषण विभाग म्हणजेच सीबीआय मार्फत चौकशी करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत केली.

**सुळे**

गेल्या काही काळात ससून रुग्णालयबाबत सातत्यानं तक्रारी येत आहेत. या रुग्णालयाच्या गेल्या पाच वर्षांच्या कामकाजाबाबत श्वेतपत्रिका काढावी आणि ससून रुग्णालयाविषयी संशयाचे धुके दूर करण्यासाठी उपाययोजना करावी अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी शासनाकडे केली आहे.

**स्थापनादिन**

ऐतिहासिक अहमदनगर शहराचा 534वा स्थापना दिवस काल उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्तानं आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात सामाजिक सलोखा आणि धार्मिक ऐक्याचा संदेश देण्यात आला. यावेळी शायरी, भक्तीगीत, कविता आणि मुशायऱ्याच्या जुगलबंदीचा आनंद उपस्थित नगरकरांनी लुटला.

**नक्षलसमर्पण**

छत्तीसगड राज्यातला एक कडवा नक्षलवादी काल गडचिरोलीमध्ये केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांसमोर शरण आला. गणेश पुनेम असं या पस्तीस वर्षीय नक्षलवाद्याचे नाव असून त्याच्यावर ६ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर झालं होतं.

**डबे**

पश्चिम रेल्वेच्या पालघर रेल्वे स्थानकात मालगाडीचे जवळपास ७ डबे काल संध्याकाळी रुळावरून घसरले. यामुळे पश्चिम रेल्वेची मुंबईच्या दिशेने जाणारी सेवा विस्कळीत झाली होती.

**धुळे वृक्षलागवड**

धुळ्यात पन्नास लाख वृक्ष लागवडीचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व विभागांनी सूक्ष्म नियोजन करावं अशा सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्या आहेत. बिहार पॅटर्न नुसार 200 रोपांच्या एक घटकाचे संगोपन करण्याची जबाबदारी 4 कुटुंबांना द्यावी, तसंच शालेय शिक्षण विभागाने एक विद्यार्थी एक वृक्ष हा उपक्रम अकोला पॅटर्न म्हणून जिल्ह्यात राबवावा. अशा विविध सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

**धाराशिव पशुधन**

धाराशिव जिल्ह्यात पाणीटंचाई तीव्र असली तरीही पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याची मुबलक उत्पादकता आहे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत चारा टंचाई भासणार नाही, असं जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.वाय.बी.पुजारी यांनी कळवलं आहे

**धुळे पाणी आंदोलन**

धुळ्यात तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून, नागरिकांना दहा दहा दिवस पाणी मिळत नाही. तर मोहाडीत महिन्यातून दोन वेळा पाणीपुरवठा होतो. यावर महापालिका प्रशासनाने उपाययोजना करुन पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी करणारे निवेदन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने काल अतिरिक्त आयुक्तांना देण्यात आलं.

**नवीमुंबई नालेसफाई**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातल्या नैसर्गिक नाले स्वच्छतेची  पाहणी पालिका आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांनी काल केली. शहरातल्या 77 मोठ्या नैसर्गिक नाल्यांची 100 टक्के सफाई पूर्ण झाली असून उर्वरित 19 मोठ्या नाल्यांची 30 टक्के राहिलेली स्वच्छता येत्या 5 दिवसात पूर्ण होईल, अशी माहिती यावेळी आयुक्तांनी दिली.

**गोंदियापाऊस**

गोंदियामध्ये काल वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. प्रचंड उकाड्यानं हैराण नागरिकांना या पावसाने दिलासा मिळाला. या  पावसानं तापमानाचा पारा घटला असला तरीही कापणीला आलेल्या धान पिकाला त्याचा फटका बसणार आहे.

**हवामान**

येत्या २४ तासात कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, राज्याच्या उर्वरित भागात हवामान कोरडं राहील. तसंच विदर्भात आज उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

शेवटी पुन्हा ठळक बातम्या

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार